# महाराष्ट्र राज्य निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे-9
# सन 2022-23 या कालावधीसाठी संघटनेच्या वतीने
# सरचिटणीसांचा प्रशासकीय अहवाल

1) **महाराष्ट्र शासनाकडून सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या कृतिशील व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा व त्यांच्या स्वत:च्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत रहावेत** या उद्देशाने कृतिशिल निवृत्त अधिकारी कर्मचारी मध्यवर्ती संस्था पुणे येथे दि.31/05/2014 रोजी कार्यरत झाली आहे. हि संस्था, सहाय्यक संस्था निबंधक, पुणे यांचेकडील नोंदणी क्र. 1151 दि.31/05/2014 अन्वये तसेच धर्मादाय आयुक्त, पुणे यांचेकडील नोंदणी क्र. फ-48300 दि.23/03/2017 अन्वये शासन मान्य आहे.

2) माहे मे 2014 मध्ये मंत्रालय, मुंबई येथे आखील भारतीय राज्य कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. र. ग. कर्णीक, महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री.अरुण बोंगिरवार, निवृत्त पोलिस महासंचालक श्री.अरविंद इनामदार, श्री.नंदकुमार जंत्रे, निवृत्त सचिव, सा.प्र.विभाग, मंत्रालय, श्री.भालचंद्र जोशी, निवृत्त अवर सचिव, पाटबंधारे विभाग, श्री. योगीराज खोंडे, अध्यक्ष, राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटना, मंत्रालय, श्री. टी. के. गुरव, अध्यक्ष, कर्मचारी कल्याणकारी संस्था, पुणे यांनी एकत्र येऊन "**कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था**" स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी आमंत्रित केलेल्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची निवड करणेत आली.

| अ. क्र | सर्वश्री / श्रीमती | **पद** |
|---|---|---|
| 1 | अरुण बोंगिरवार, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| 2 | अरविंद सिद्धेश्वर इनामदार, भा.पो.से. | विशेष अध्यक्ष |
| 3 | नंदकुमार येडबा जंत्रे, भा.प्र.से. | उपाध्यक्ष |
| 4 | शितल अशोक गुप्ते | उपाध्यक्षा |
| 5 | रमाकांत गणेश कर्णीक | कार्याध्यक्ष |
| 6 | भालचंद्र त्र्यंबक जोशी | सहकार्याध्यक्ष |
| 7 | शिवदास रंगनाथ साळुंके | सचिव |

| अ. क्र | सर्वश्री / श्रीमती | **पद** |
|---|---|---|
| 8 | तुकाराम केशव गुरव | सहसचिव |
| 9 | दादाराव चिनकुजी सांगळे | कोषाध्यक्ष |
| 10 | नारायण सखाराम गरुड | सहकोषाध्यक्ष |
| 11 | सुलोचना हरसिंग पाटील | सदस्य |
| 12 | योगिराज खोंडे, अध्यक्ष, राज्य कर्मचारी संघटना, मुंबई | पदसिद्ध सदस्य |
| 13 | टी.के.गुरव, अध्यक्ष, शास. कर्म. कल्याणकारी संस्था, पुणे | पदसिद्ध सदस्य |

3) अ) दि.27/03/2022 रोजीच्या पहिल्या सर्वसाधारण बैठकीत व दि.27/03/2023 च्या सर्वसाधारण बैठकीत कार्यकारीणी गठीत करणेत आली ती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | सर्वश्री / श्रीमती | **पद** |
|---|---|---|
| 1) | श्री.चंद्रकांत दळवी (भाप्रसे) | अध्यक्ष |
| 2) | इजि. व्यंकटराव गायकवाड | विशेष अध्यक्ष |
| 3) | श्री.उमाकांत दांगट (भाप्रसे), ि | विभागीय अध्यक्ष, मराठवाडा प्रादे.विभाग |
| 4) | इंजि. प्रकाश भामरे | विभागीय अध्यक्ष, नाशिक प्रादे.विभाग |
| 5) | श्री. बाजीराव जाधव (भाप्रसे) | उपाध्यक्ष |
| 6) | श्री.दिलीप एम. देशमुख, | उपाध्यक्ष |
| 7) | श्री. रविंद्र धोंगडे | उपाध्यक्ष |
| 8) | श्री.सुमेंद्रकुमार काले | उपाध्यक्ष |
| 9) | इंजि.मनोहर पोकळे | कार्याध्यक्ष |
| 10) | इजि.बाळासाहेब साळुंके | सहकार्याध्यक्ष |
| 11) | श्री.बापूसाहेब सोनवणे | संघटक |
| 12) | श्री.तुकाराम गुरव | सरचिटणीस |
| 13) | ॲड. दशरथ बनसोडे | चिटणीस |
| 14) | श्री.सुनिल कुऱ्हाडे | कोषाध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| 15) | इजि. गिरीश सांगळे | सहकोषाध्यक्ष व तांत्रिक सल्लागार |
| 16) | श्रीमती सुनंदा जरांडे | महिला सरचिटणीस, नाशिक प्रादे.विभाग |
| 17) | श्रीमती नयना थोरात (हरिहर) | महिला सरचिटणीस, पुणे प्रादे.विभाग |
| 18) | श्री.विनायक दळवी | सदस्य |
| 19) | श्री.प्रदिप गुरव | सदस्य |
| 20) | श्री.अशोक सोनू जाधव | सदस्य |
| 21) | श्री.शांताराम ठकार | सदस्य |
| 22) | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, मुंबई | पदसिद्ध सदस्य |
| 23) | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, मुंबई | पदसिद्ध सदस्य |

4) स्थापनेनंतर आजअखेर राज्यात अहमदनगर, मालेगाव, मालेगाव शहर, परभणी, पुणे, सातारा, सांगली, नाशिक, छ.संभाजीनगर, नांदेड, नागपूर, भंडारा, अमरावती, सोलापूर, ठाणे या **15 जिल्ह्यांत** जिल्हा **शाखा कार्यरत** आहेत. तसेच राज्यात इतर **20** जिल्ह्यात अकोला, जळगाव, धुळे, जालना, बीड, लातूर, धाराशिव, हिंगोली, कोल्हापूर, चंद्रपूर, नागपूर परिसर, बुलढाणा, वर्धा, रायगड, सिंधूदुर्ग, रत्नागिरी, पालघर, मुंबई शहर व उपनगर, वाशिम, यवतमाळ इ. ठिकाणी प्रवर्तक नेमण्यात आले असून संघटना बांधणीचे काम जोराने सुरु आहे. तर उर्वरीत 2 जिल्ह्यांत नंदूरबार, व गडचिरोली प्रवर्तक नेमण्याची चाचपणी सुरु आहे. माहे डिसेंबर **2024** अखेर महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांत **कृतिशील शाखा** कार्यरत करण्याचा निर्धार या नूतन वर्षाचे आरंभास करणेत आला आहे. राज्यातील सध्या कार्यरत 15 जिल्ह्यातील समन्वय समितीचे पदाधिकारी यांचा नाववार तक्ता तसेच उर्वरीत 20 जिल्ह्यातील कार्यरत प्रवर्तकांचा तपशिल या सोबतच्या पुस्तिकेत करण्यात आला आहे.

ब) दि.26/03/2023 चे दुसऱ्या सर्वसाधारण बैठकीत विभागीय स्तरावरील पदाधिकारी यांची निवड करणेत आली.

1) श्री.उमाकांत दांगट, विभागीय आयुक्त (से.नि.) औरंगाबाद. -मराठवाडा प्रादेशिक विभाग
2) इंजि.प्रकाश भामरे, सचिव (से.नि.) जलसंपदा - नाशिक विभाग
3) श्रीमती सुनंदा जरांडे, महिला सरचिटणीस, नाशिक विभाग

4) श्रीमती नयना थोरात (हरिहर), महिला सरचिटणीस, पुणे विभाग

5) **सेवानिवृत्तांचे पेंशनविषयक प्रश्न सोडविणे, त्यांच्या सुरक्षिततेची व स्वास्थ्याची काळजी घेणे ही कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत. तसेच त्यांचे वैयक्तिक अडीअडचणींवर, त्यांनी विनंती केल्यास, त्यांना मोफत सल्ला/मार्गदर्शन करण्यात येत आहे.**

केंद्र सरकारने जेष्ठ नागरिकांसाठी सुधारीत 2016 मागदर्शक सूचना तर महाराष्ट्र शासनाने सुध्दा दि.9 जुलै 2018 च्या शासन निर्णयान्वये जेष्ठ नागरिकांचे धोरण प्रसिध्द केले आहे. शासनाने प्रसिध्द केलेल्या धोरणाबाबत येणाऱ्या अडीअडचणी तसेच विनासायास त्याची अंमलबजावणी होणेच्या दृष्टीकोनातून आपल्या निवृत्त बंधू भगिनींना तसेच असंघटीत ज्येष्ठ नागरिकांना सरकारच्या धोरणांची माहिती उपलब्ध करुन देणेसाठी राज्यस्तरावर या संस्थेकडून/संघटनेकडून कार्यवाही होणेही अत्यावश्यक आहे.

सेवानिवृत्त व जेष्ठांसाठी आरोग्य तपासणी तसेच व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, संमेलने आयोजित करणे, सभासदांचे हितसंबंध वृध्दींगत व्हावे, या व अशा एकना अनेक बाबींच्या दृष्टीने सामाजिक बांधीलकी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

संघटन अधिक कार्यक्षम व तत्पर होणेसाठी तालुका, जिल्हा व प्रदेश पातळीवर तसेच राज्यभर बळकटीकरण व विस्तार करणेकामी तसेच आपणा सर्वांची वयोमानात झालेली वृध्दी विचारात घेता आपण सर्व निवृत्त अधिकारी कर्मचारी यांनी राज्यभर एकत्र येऊन कार्यक्षम संस्था म्हणून लौकीक मिळवू या असे आवाहन करण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक सभासदाने **रु.5000/-** आश्रयदाता, रु.**1000/-** आजीव सभासद फी व रु.**100/-** वार्षिक सभासद फी तसेच प्रवेश फी रु.**10/-** फॉर्म भरुन आपला सहभाग नोंदवावा, ही आग्रहाची विनंती.

6) सभासद नोंदणी अभियान याही वर्षात राबविणेत आले. याचा परिणाम म्हणून राज्यात 3340 आजीव 315 वार्षिक असे एकूण 3665 सभासदांची नोंदणी करण्यात आली.

7) महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटना या **संस्थेसाठी उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करणेबाबत परिपत्रक क्र.7 दि.2/11/2022 निर्गमित करुन कामकाज गतिमान करणेचा प्रयत्न** केला आहे. **आयकर अधिनियम 80-जी नुसार प्रस्ताव आयकर विभागाकडे यावर्षी (सन 2023-24) आयकर प्रमाणपत्र विचारात घेऊन** मानद सल्लागार यांचे मार्फत सादर करीत आहोत.

8) महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटनेमार्फत **हाती घ्यावयाची उपक्रमांची यादी** परिपत्रक क्र.10 जा.क्र.179 दि.25/12/2022 नुसार सर्व जिल्हा शाखांना प्रसारित केली. तसेच या स्मरणिकेत परत सर्वांचे माहितीकरीता समाविष्ट केली आहे.

9) सेवानिवृत्त व जेष्ठ नागरिकांसाठी समाजोपयोगी कार्यक्रम राबविणेचा वार्षिक आराखडा तयार करणेकामी निर्देश सूचना क्र.32 दि.2/4/2022, 33 दि.18/4/2022, 35 दि.3/8/2022, 161 दि.3/12/2022 व 180 दि.25/12/2022 नुसार तसेच समक्ष जिल्हा दौऱ्यात, जिल्हा शाखांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. **त्यानुसार जिल्हास्तरीय शाखेने उपक्रम हाती घ्यावेत. यात जिल्हास्तरीय समितीस अजून काही उपकम हाती घ्यावेसे वाटले तरी ते घेता येतील अशी लवचिकता ठेवणेत आली आहे.**

10) **1 जाने.2016 पूर्वीचे तसेच 80 वर्षे व त्यावरील अतिवृद्धनिवृत्ती वेतनधारकांना सेवानिवृत्ती वेतन धारक/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना नोशनल पद्धतीने पे फिक्सेशन तसेच निवृत्तीवेतन अंशराशीकरणाची पुनर्स्थापना करणे कामी लढानिधी उभारणेबाबत** संघटनेच्या सर्व सदस्यांना जा.क्र.152 दि.2/11/2022, 156 दि.16/11/2022 तसेच लढानिधी उभारणेच्या **सुचना परिपत्रक क्र.8 (सु-सुधारीत) निर्गमित केल्याने** आज माहे एप्रिल 2024 अखेर रु.222230/- लढानिधी न्यायालयीन प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी उपलब्ध झाला आहे.

11) उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी **रिट याचिका क्र.3833/2018 शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने अवमान याचिका** क्र. 370/2019 व 372/2019 यात कालवा निरीक्षक, मोजणीदार या पदांच्या वेतननिश्चीती राज्य वेतन समिती 2017 (बक्षी समिती) अहवाल खंड-2 नुसार शासनास सादर केलेल्या दि9/2/2021 रोजी **एकाकी पदासंदर्भात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार 3 महिन्यांचे आत मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेऊन अन्याय दूर करणेबाबत शासनास** जा.क्र.9 दि. 11/1/2023 नुसार पाठपुरावा चालू आहे. राज्य वेतनत्रुटी समितीने खंड-2 अहवाल दि.8/2/2021 रोजी सुधारणेसह शासनास सादर केला त्यामध्ये जलसंपदा विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाचा विचार झाला नाही. यास्तव शासनास दि.03/02/2024 रोजी पुढील वेतनत्रुटी समितीकडे फेर प्रस्ताव सादर करावा अशी विनंती केली आहे.

12) दि.1 जाने. 2016 पूर्वी निवृत्त झालेल्या पेन्शनरांकरीता 7 व्या वेतन आयोगात बेसीक पे रिव्हीजन व 80 वर्षे व त्यावरील अतिवृद्ध निवृत्ती वेतनधारकांसाठी

अतिरिक्त वेतन मिळणेकामी तसेच निवृत्तीवेतन अंशराशीकरण पुनर्स्थापना होणेकामी **सभासदांच्या हिताची जोपासना करण्यासाठी आवश्यकता असल्याने मा.उच्च न्यायालयात/ सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करणेकामी विहीत प्रपत्रात माहिती उपलब्ध करणेबाबत परिपत्रक क्र.12 दि.2/2/2022 नुसार माहिती मागवून भविष्यात त्यांनाच फायदा होऊ शकतो**, त्यायोगे जास्तीत जास्त सभासदांची नावे अंतर्भूत व्हावीत यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन सर्व राज्यातील पदाधिकाऱ्यांना करण्यात आले आहे. त्यानुसार परिपूर्ण प्रस्ताव 9 जिल्हयाचे आजअखेर प्राप्त झाले आहेत. त्यात सादर सातारा, नांदेड, कोल्हापूर, नागपूर, सोलापूर, अहमदनगर, अमरावती, पुणे, मालेगाव जिल्हे आहेत. यासाठी दि.02/02/2023 पासून 5 वेळा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

**13)** महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी महासंघ स्थापन करणेकामी जिल्हा पातळीवर महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटना तसेच **राज्यातील नोंदणीकृत राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर सेवा निवृत्तांच्या संस्थांना संलग्नता देण्याबाबत अभ्यास करणेसाठी नेमलेल्या अभ्यासगटाची माहिती दोन बैठका पार पडल्या.** राज्यातील मान्यताप्राप्त पेन्शनर असोसिएशनची माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालय यांचेकडून मागणी केली आहे. पाठपुराव्याअंती अशी यादी राज्यस्तरावर विभागीय स्तरावर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आल्याने बैठकीच कामकाज या वर्षात होऊ शकले नाही. महासंघ स्थापन करण्यात विविध सेवा निवृत्तांचे संघटनाची नोंद धर्मादाय आयुक्तांकडे नसल्याने त्यास बराचसा वेळ लागू शकतो. याचा विचार करता महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य प्रवर्तक श्री. ग. दि.कुलथे यांचे मार्गदर्शनाखाली राज्यातील शासकीय/निमशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या प्रश्नांबाबत विविध निवृत्ती वेतन धारकांच्या संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक दि.26/10/2023 रोजी मुंबई येथे पार पाडली. **सदर बैठकीत निवृत्ती वेतन धारकांच्या विविध संघटनांचा महासंघ स्थापन करावा असे ठरले.** यासाठी महाराष्ट्र राज्य शासकीय/ निमशासकीय निवृत्ती वेतन धारक समन्वय समितीची स्थापना करण्यात येवून **आपल्या कृतिशील संघटनेचे उपाध्यक्ष श्री.रविंद धोंगडे यांची समन्वयकपदी निवड करण्यात आली**. त्याचा परिपाक म्हणून दि.27/12/2023 रोजी लक्षवेध दिनासाठी मुक्रर करण्यात आला. त्यानुसार प्रशासनाची धावपळ झाली व **लक्षवेध दिन 80 वर्षापेक्षा जास्त सेवानिवृत्तांना केंद्राप्रमाणे अतिरिक्त निवृत्तीवेतन मंजूर झाल्यास धरणे आंदोलन स्थगित करण्यात आले.**

14) मध्यवर्ती संघटनेच्या स्तरावर दि.27/03/2022 च्या सर्वसाधारण सभेत घटना दुरुस्ती होऊन एकूण 41 पदे मंजूर करण्यात आली. त्यात मध्यवर्ती पुणे मुख्यालयी 20 पदे मंजूर असून विभागीय स्तरावर 21 पदे मंजूर करण्यात आली. त्यापैकी 9 पदे भरण्यास मान्यता देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 1) | उपाध्यक्ष : | श्री.सुमेरकुमार काले, सेवानिवृत्त राज्यकर आयुक्त, वस्तु व कर विभाग |
| 2) | संघटक : | श्री.बापूसाहेब सोनवणे, से.निवृत्त प्रमुख विवाह समुपदेशक |
| 3) | कार्यकारी सदस्य : | 1. श्री.शांताराम सहदेव ठकार, से.नि.दप्तरी<br>2.श्री.प्रविण प्रभाकर गुरव, पोलिस उपनिरीक्षक<br>3.श्री.विनायक शांताराम दळवी, से.नि. कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन अधिकारी |
| 4) | उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक विभागीय अध्यक्ष | इंजि. प्रकाश भामरे, सेवानिवृत्त सचिव, (लाक्षेवि) जलसंपदा |
| 5) | मराठवाडा प्रदेश, औरंगाबाद विभागीय अध्यक्ष | श्री. उमाकांत दांगट, से.नि. विभागीय आयुक्त, औरंगाबाद |
| 6) | उ.म.प्र. नाशिक महिला सरचिटणीस | श्रीमती सुनिता जरांडे, से.नि. वरिष्ठ लिपीक, जलसंपदा |
| 7) | पुणे प्रदेश महिला सरचिटणीस | श्रीमती नयना थोरात (हरिहर) से.नि. शिक्षीका, सोलापूर |

**15)** संस्थेचे पत्रव्यवहारासाठी ई मेल आयडी "asgrf2014@gmail.com" कार्यान्वित करणेत आला येऊन नाशिक, पुणे, सातारा, अमरावती, सोलापूर, परभणी यांचे ई.मेल आयडी तयार करण्यात आले असून वापरही सुरु करण्यात आला आहे, तर उर्वरीत जिल्हयांचे ई.मेल आयडी **स्मरणिका 2022 मध्ये पान क्र. 112 व स्मरणिका 2023 मध्ये पान क्र. 190 वर तयार केले असून त्यांनी ते कार्यान्वित करुन वापर करणे अपेक्षित आहे.** राज्यात सोलापूर, सातारा, अहमदनगर, मालेगाव, पुणे मध्यवर्ती, रत्नागिरी, नागपूर, नांदेड, नाशिक, पुणे, मालेगाव शहर, अमरावती, गोंदिया, छ.संभाजीनगर यांनी ईमेल वरुन माहिती सादर केली. **मात्र कोणत्याही जिल्हयाने संघटनेने त्यांना दिलेल्या ईमेल आयडी वरुन माहिती पाठविली नाही. त्यांनी त्यांच्या स्वत:च्या /नातेवाईक /मित्रमंडळी यांचे मेल आयडी वरुन माहिती पाठविली. प्रत्येक जिल्हयाने त्यांचे मेल आयडी वरुनच माहिती पाठविणेची दक्षता घ्यावी, त्यायोगे आपले सदस्यांना आपणाशी संपर्क करणेस त्याचा उपयोग होईन.**

16) प्रत्येक सदस्याचे **वैयक्तिक तपशील प्रपत्रही** अंतिम करणेत आले असून अशी माहिती भविष्यातील कामाचे नियोजनासाठी जिल्हा/राज्यस्तरावर वापर करणेत

यावा असे अपेक्षित आहे. याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. याबाबतीत प्रत्येक जिल्हास्तरावरुन कार्यवाही झाली नाही. त्यायोगे कृतिशील /अकृतिशील खातेनिहाय वर्गीकरण नसल्याने कृतिशील व्यक्तींच्या सेवा वापरात येताना दिसत नाही. याबाबत येत्या दोन महिन्यात वर्गीकरण पूर्ण करुन अहवाल मध्यवर्ती संघटनेस पाठवावा.

17) जिल्हा कार्यकारी मंडळास मदतनीस म्हणून **(अ) पेंशनर उपसमिती, (ब) दक्षता उपसमिती व (क) आरोग्य उपसमिती** स्थापन करुन संस्थेचे कामकाज लोकाभिमुख होऊन समाजात चेतन्य निर्माण होवून संस्था आधारवृक्ष म्हणून कार्यरत राहणार आहे. अश्या समित्या पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा समन्वय समितीने स्थापन करुन कामही सुरु केले आहे. तर उर्वरीत जिल्हा समन्वय समितीकडून अशी कार्यवाही अपेक्षित असून येत्या 1-2 महिन्यात समित्या स्थापन करुन मध्यवर्तीस कळविणे अपेक्षित आहे.

18) हि संस्था व त्यांचे अंतर्गत जिल्हा समन्वय समितीचे कामकाज पारदर्शक होणेचे दृष्टीने उपलब्ध निधीतून खर्च भागविणेसाठी **काटकसरीच्या उपाययोजनास मान्यता** देणेत येऊन सर्वांनी अनुपालन करणेची आवश्यकता आहे. याबाबत स्मरणिका 2022 व स्मरणिका 2023 मध्ये मार्गदर्शन करण्यात आले आहे.

19) **"कृतिशील निवृत्त राज्यस्तरीय विचार मंच"** - सर्वांना सन्मानाने जीवन जगता यावे, ज्येष्ठ नागरीक धोरण सन 2018 ची अंमलबजावणी, नवनवीन संकल्पनांचा वापर करुन आरोग्य सुखकारक व्हावे, असंघटीत क्षेत्रातील ज्येष्ठांना आपल्या सेवा कालावधीत मिळालेले ज्ञानाचा वापर करुन जीवन जगणे सुकर व्हावे, हा विचार या मंचासाठीचा आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेंशनचे व इतर जीवनातील प्रश्नांबाबत सोडवणूक करणेसाठी सर्वतोपरी मदत करणे, सुशिक्षित तरुण, महिला, दिव्यांगासाठी उचित मार्गदर्शन व शासनाच्या विविध योजना राबविणेस मदत करणे, इ. यासाठी **"**विद्या विनयेन शोभते**"** व **"**विद्वान सर्वत्र पुज्यते**"** या प्रचलित निकषाद्वारे शासनाकडे नवनवीन प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. हा मंच दि.1 जानेवारी 2022 पासून कार्यान्वित करणेत आला असून तो कार्यक्षमतेने कार्यरत आहे. आजअखेर या विचारमंचावर 35 सदस्य आहेत.

20) कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संस्थेची उद्दीष्टे, भूमिका, कार्यकक्षा, सभासद नोंदणी अभियान त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी याविषयी सविस्तर सुसंवाद साधणेसाठी विविध जिल्ह्यांचे खालीलप्रमाणे दौरे करण्यात आले.

(अ) नागपूर महसूल विभागात कार्याध्यक्ष, सरचिटणीस यांनी दि.25/08/2023 ते 30/08/2023 या कालावधीत नागपूर, भंडारा, गोंदिया

(आ) अमरावती महसूल विभागात कार्याध्यक्ष, सरचिटणीस यांनी दि.22/07/2023 ते 23/07/2023 या कालावधीत बुलढाणा. अतिवृष्टीने दौरा स्थगित, तथापी अमरावती महसूल विभागाचा कार्याध्यक्ष व सरचिटणीस यांनी दि.31/08/2023 ते 06/09/2023 या कालावधीत बुलडाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, हिंगोली, परभणी, बीड.

(इ) नाशिक येथे महसूल विभागात विभागीय अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांची दि.05/07/2023 रोजी नाशिक विभागीय बैठक संपन्न.

(ई) कोकणात कार्याध्यक्ष, सरचिटणीस, व चिटणीस दि.20/11/2023 ते 21/11/2023 या कालावधीत ठाणे जिल्हा कार्यकारीणीचा आढावा व त्यांचेमार्फत आयोजि 'मुजरा लावणीचा' या कार्यक्रमास उपस्थिती, तसेच पालघर येथे प्राथमिक बैठकीस उपस्थिती.

(उ) अमरावती महसूल विभागाची विभागीय आढावा बैठक अमरावती येथे दि.24/12/2023 रोजी संपन्न.

(ऊ) मराठवाडा प्रादेशिक विभागात कार्याध्यक्ष, पुणे जिल्हयाचे कार्याध्यक्ष यांनी दि.30/7/2023 व 31/07/2023 या कालावधीत जालना व छ.संभाजीनगर जिल्हा दौरा संपन्न.

(ऋ) श्री.सोनवणे, संघटक, विवाह समुपदेशक यांनी दि. 24/9/2023 रोजी खारघर येथे मोफत कायदेशिर सल्ला (कौटुंबिक कलह) या विषयावर मार्गदर्शन केले.

21) राज्यात तालुकास्तरीय शाखा प्रथमच सुरु करण्याचा मान शिरुर तालुका, पुणे जिल्हा यांनी पटकाविला आहे. त्यांनी 1 आश्रयदाता, 161 आजीवन व 17 वार्षिक असे एकूण 179 सभासदांची नोंद केली. याचे श्रेय इंजि.भारत बेंद्रे व त्यांचे सहकारी यांना जाते.

22) कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेसाठी **डिजीटल प्लॅटफॉर्म पुर्ण क्षमतेने कार्यरत करणेचा संकल्प करण्यात आला.** यात संघटनेचे संकेत स्थळ, ईमेलद्वारे पत्रव्यवहार, फेसबुक पेज, व व्हॉटस्अॅप ग्रुप गतिमान अद्यावत करणे, यात मध्यवर्ती संघटनेचे ग्रुप्स व जिल्हास्तरीय ग्रुपचा समावेश आहे.

23) **नूतन वर्ष सन 2024 चा संकल्प** :

अ) या वर्षअखेरीस आणखी 10 जिल्हा शाखा कार्यरत करणे.

ब) जिल्हास्तरीय पेन्शनर, दक्षता व आरोग्य उपसमित्या कृतिशील जिल्हा शाखांनी तात्काळ कार्यान्वित करणे (15 जिल्हा शाखा)

क) 1 जाने.2016 पूर्वी निवृत्त झालेल्या पेन्शनरांकीता नोशनल पे फिक्सेशन पद्धतीने 7 व्या वेतन आयोगात बेसिक पेन्शन रिव्हीजन, 80 वर्षे व त्यावरील

अतिवृद्‌ध निवृत्तीवेतन धारकांसाठी मंजूर अतिरिक्त निवृत्ती वेतन मिळवणे:दि.01/01/2006 पासून मिळविणे व निवृत्तीवेतन अंशराशी करण पुनर्स्थापना कालावधी 15 वर्षेवरुन 12 वर्षे करणे कामी लढा निधी उभारणी करणे.

ड) जिल्हा व राज्यस्तरीय कृतिशील संघटनेने सभासद फी कायम ठेवीत अबाधीत ठेवून उत्पन्नाचे स्त्रोत विकसीत करुन स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करणे

इ) महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी महासंघ स्थापन करणेकामी विशेष प्रयत्न करणे, त्याचबरोबर शासकीय व निमशासकीय निवृत्तीवेतन वेतन समन्वय समितीत महत्वपूर्ण सहभाग नोंदवून शासनाकडे प्रलंबित बाबींसाठी पाठपुरावा करणे.

ई) राज्यात पुणे, मुंबई, कोकण महसूल विभागाचा जिल्हानिहाय दौरा पूर्ण करणे.

फ) जिल्हा/मध्यवर्ती स्तरावर कार्यगट (Task Force) स्थापन करणे

ज) संघटना गतीमान करणेसाठी '**पालक अधिकारी**' मार्फत जिल्हा शाखा व विभागीय स्तरावर समन्वय साधणे

ट) संघटनेचे सदस्य व ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक उपक्रमाचे आयोजन करुन संस्थेची आगळी वेगळी ओळख करुन देणे.

24) पेन्शनर उपसमितीचे सदस्यांना मानधन देणेबाबत परिपत्रक क्र.17 दि.27/09/2023 निर्गमित केले.

25) दि.05/07/2023 रोजी नाशिक प्रादेशिक विभागाची राज्यात प्रथम बैठक संपन्न झाली. एकूण 27 सभासद उपस्थित. या बैठकीस इंजि.प्रकाश भामरे यांचे अध्यक्षतेखाली व कार्याध्यक्ष इंजि.मनोहर कि. पोकळे यांचे उपस्थितीत पार पडली. कार्याध्यक्ष यांनी मध्यवर्तीच्या कामांचा आढावा व पुढील विभागीय कार्याची रुपरेशा स्पष्ट केली. सर्व उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करण्यात येऊन सर्व शंकांचे निरसन करण्यात आले.

26) इंजि. प्रकाश भामरे, विभागीय अध्यक्ष, नाशिक व माजी सचिंव जलसंपदा तसेच श्रीमती सुनंदा जरांडे, महिला सरचिटणीस यांनी दि.12 व 13 मार्च 2024 या दोन दिवसांच्या दौऱ्यात जळगाव - 40, धुळे-32, व नंदूरबार 10 अशी एकूण 82 सभासदांची नोंदणी केली.

27) कृतिशील मध्यवर्ती संघटनेकडील सेवानिवृत्ती प्रकरणांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | एकूण | निकाली | प्रगतीत | अपूर्ण | न्यायालयीन |
|---|---|---|---|---|---|

| | प्रकरणे | | | कागदपत्रे | प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| 2021 | 27 | 27 | -- | -- | -- |
| 2022 | 41 | 22 | 13 | 5 | 1 |
| 2023 | 56 | 12 | 39 | 5 | -- |
| बंगलोर शाखा | 13 | 13 | -- | -- | -- |
| **एकूण** | **137** | **74** | **52** | **10** | **1** |

28) <u>सातारा जिल्हा शाखा</u> :

1. मिलींद सोसायटी हॉलमध्ये दि.28/4/2023 रोजी **अवयवदान** या विषयावर उदबोधाक व्याख्यान संपन्न. त्यानंतर सौ.सुरेखा कदम यांनी "**अमेरिका प्रवासातील अनुभव**" या विषयावर मनोरंजक माहिती दिली.
2. सातारा डायग्नोस्टिक सेंटरचे हॉलमध्ये दि.11/5/2023 रोजी **ज्येष्ठांसाठी मनोजंरक** व्याख्यान. तीन तास भरगच्च कार्यक्रम.
3. 24 मे ते 27 मे 2023 - कर्नाटक सहल, बेळगाव, कारवार, दांडेली अभयारण्य, गोकर्ण महाबळेश्वरआदि स्थळांना भेट, 30 सदस्य सहभागी
4. 30 जून 2023 रोजी मिलींद हौसिंग सोसायटीच्या हॉलमध्ये प्रा.डॉ.श्यामला माने यांचे ज्येष्ठांचा आनंदी "**जीवन जगण्याचा मुलमंत्र**" या विषयावर व्याख्यान
5. दि.31/8/2023 रोजी व दि.27/04/2024 च्या मासिक सभेत अभिजित माने यांचे **ब्रेन हॅकिंग** या विषयावर प्रात्यक्षिकांसह व्याख्यान संपन्न.
6. प्रा. पी. जे. जाधव सेवानिवृत्त ग्रुप मेडिकल इन्शुरन्स संदर्भात विमा कंपन्या व काही खाजगी विमा कंपन्यांना अत्यंत परिश्रमपूर्वक प्रस्ताव तयार करुन त्या कंपन्यास पाठविले. पाठपुरावा मध्यवर्तीकडून चालू आहे.
7. नाडी परिक्षण व आरोग्य शिबीर दोनदा (250 लाभार्थी) डॉ.नजम अली कादरी यांचेकडून श्री.पी.एस.पाटील व प्रा.बी.जे.जाधव यांचे पुढाकारातून संपन्न. त्याचा फायदा सभासद व ज्येष्ठ नागरिकांना झाला. या उपक्रमाचे सर्वच स्तरावर कौतुक होत आहे.

8. संघटनेचा सहावा वर्धापन दिन व स्मरणिका प्रकाश सोहळा दि.24/12/2023 रोजी मा. चंद्रकांत दळवी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न. यातून रु.3.50 लक्ष जाहिरातीपोटी संस्थेस उत्पन्न प्राप्त. राज्यात अभिनव उपक्रम राबविला.

29) <u>अहमदनगर जिल्हा शाखा</u> :

नाडी परिक्षण व आरोग्य तपासणी भारतातील सुप्रसिद्ध नाडीतज्ञ डॉ.नजम अली कादरी यांचे मार्गदर्शनाखाली सन 2023-24 मध्ये 6 शिबीरे घेऊन 570 लाभार्थींची तपासणी करण्यात येऊन जिल्हा शाखेस रु.39,100/- निधी उपलब्ध झाला. यासाठी संस्थेचे अध्यक्ष इंजि.मनोहर पोकळे यांनी त्यांचे स्वत:चे खर्चाने पायाभूत सोयी उपलब्ध करुन दिल्या. जिल्हा शाखेचा खर्च काहीही झाला नाही. सर्वत्र या उपक्रमाची प्रशंसा होत आहे.

30) <u>पुणे जिल्हा शाखा :</u>

नाडी परीक्षण व आरोग्य तपासणी शिबीर भारतातील सुप्रसिद्ध नाडीतज्ञ डॉ.नजम अली कादरी यांचे मार्गदर्शनाखाली सन 2023-24 मध्ये 4 शिबीरे घेऊन 350 लाभार्थींची तपासणी करण्यात येऊन जिल्हा शाखेस रु.39500/- निधी उपलब्ध झाला. या जिल्हा शाखेचे कार्याध्यक्ष इंजि. भारत बेंद्रे व अध्यक्ष इंजि.अरुण कांबळे यांनी स्वखर्चाने शिबीरांचे आयोजन केले. त्यामुळे जिल्हा शाखेस निधी उपलब्ध झाला. तसेच पुणे येथेही एक दिवशीय नाडी परीक्षण शिबीर दि.21 एप्रिल व दि.16 व 17 मे 2023 असे दोनदिवशीय शिबीरे संपन्न केले. अतिशय स्तुत्य उपक्रम म्हणून जनतेकडून प्रशंसा मिळाली.

31) <u>नाशिक जिल्हा शाखा :</u>

1. दि.09/09/2023 रोजी 22 कृतिशील पदाधिकारी यांनी मांगीवांगी येथे एक दिवशीय सहज आयोजित केली. या सहलीची व्यवस्था पणे श्री.काले साहेब व श्री.घोरपडे यांनी केली. अविस्मरणीय अशी सहल झाली.
2. दि.01/02/2024 रोजी कोषागार दिन कार्यक्रमास उपस्थित राहून त्यांचा सत्कार केला तदनंतर महसूल भवन येथे पदाधिकारी यांची बैठक संपन्न.
3. दि.4/2/2024 रोजी रुंगठा हायस्कूल येथे वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न.
4. दि.9/2/2024 रोजी महानगरपालीका आयुक्त, नाशिक यांना विरंगुळा केंद्राबाबत पत्र देऊन चर्चा करण्यात आली.

5. दि.26 व 27 जानेवारी 2024 रोजी पहिले नाडी परीक्षण शिबीर, सिंचन भवन, नाशिक येथे डॉ.कादरी यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न. 78 लाभार्थींची तपासणी पूर्ण करुन जिल्हा शाखेस रु.10,000/- उत्पन्न मिळाले.
6. दि.8/3/2024 ते 10/3/2024 या कालावधीत दि.8 रोजी माहिती दिनाचे औचित्य साधून 7 कर्तबगार महिलांचा सत्कार. तसेच उक्त कालावधीत नाडी परीक्षण शिबीर डॉ. नजम अली कादरी यांचे मार्गदर्शनाखाली 225 लाभाथ्यांची तपासणी पूर्ण, त्यायोगे जिल्हा शाखेस रु.10,000/- उत्पन्न मिळाले.

32) <u>मालेगाव जिल्हा शाखा</u> :

नाडी परीक्षण व आरोग्य तपासणी भारतातील सुप्रसिध्द नाडी परिक्षण तज्ञ डॉ.नजन अली कादरी यांचे मार्गदर्शनाखाली सन 2023-24 मध्ये दि.11/03/2023 रोजी एक दिवशीय शिबीर घेवून 49 लाभार्थींची तपासणी करण्यात येऊन जिल्हा शाखेस रु.6600/- उत्पन्न मिळाले. यात सर्वश्री आर.डी.पाटील, संजय पाटील व गुळेंचा यांनी विशेष मेहनत घेतली. पायाभूत सुविधा श्री.संजय पाटील व श्री. गुळेंचा यांनी उपलब्ध करुन दिल्यामुळे जिल्हा शाखेस काहीही खर्च न होता उत्पन्न मिळाले.

---0O0---